# पुणे विद्यापीठ

फोन नं. ०२०-२५६०१२७३,१२७४,१२७५
फॅक्स ०२० २५६०१२०८
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड
पुणे - ४११००७
email : coe@unipune.in

---

सं.क्र. परीक्षा/बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./८ दि. २७/०३/२०१४

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्न महाविद्यालये,
मा.संचालक/संचालिका, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

<u>विषय</u> - अध्यादेश १६३ चा फायदा देणेबाबत...

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष सन २०१३-२०१४ मध्ये द्वितीय/तृतीय वर्ष कला, वाणिज्य,व विज्ञान या शाखांच्या लेखी परीक्षा अनुक्रमे दि. ०९/०४/२०१४, ०९/०४/२०१४ व २४/०३/२०१४ पासून सुरु होत आहेत.

प्रतिवर्षीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील एन.एस.एस./एन.सी.सी./आंतरविद्यापीठ/राज्यस्तरीय/आंतरराष्ट्रीय खेळाडू च्या संदर्भात विद्यापीठ अध्यादेश १६३ चा फायदा जे विद्यार्थी घेऊ इच्छितात अशा सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील एन.एस.एस./एन.सी.सी. आंतरविद्यापीठ/राज्यस्तरीय/आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, तसेच सदर विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक अशी सर्व माहिती असलेली यादी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यापीठ क्रिडा मंडळ, पुणे विद्यापीठ विभागातून प्रमाणित करुन त्या विद्यार्थ्यांचे प्रत्येकी १०/- रु. शुल्क याप्रमाणे जेवढे पात्र विद्यार्थी असतील तेवढयांचा एकत्रित शुल्काचा **<u>डिमांड ड्राफ्ट मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे ७, यांचे नांवे दि. ३०/०४/२०१४ पूर्वी विद्यापीठ कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था</u>** **<u>करावी. कृपया डिमांड ड्राफ्ट वित्त विभागात जमा केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांची यादी व अध्यादेश १६३ चे फॉर्म संबंधित परीक्षा कक्षात जमा करावेत.</u>** यापुढे असेही कळविण्यात येते की, दि. ३०/०४/२०१४ नंतर कोणत्याही विद्यार्थ्यांच्या अशा फायद्यासाठी प्रचलीत नियमानुसार अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा नियंत्रक/२७/२०००, दि. २६/०५/२००० नुसार विद्यार्थ्यांचे एन.एस.एस./एन.सी.सी./आंतरविद्यापीठ/राज्यस्तरीय/आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचे सर्टिफिकेटस चालू शैक्षणिक वर्षाचे म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ चे असणे अत्यंत आवश्यक आहे. तशी सर्टिफिकेटस नसतील तर अध्यादेश १६३ च्या ५ गुणांचा फायदा संबंधित विद्यार्थ्यांना देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व सदर माहिती संबंधित विद्यार्थ्यांना देखील द्यावी.

**<u>अध्यादेश क्र. १६३ चे विहीत नमुन्यांतील अर्ज विद्याशाखानिहाय विद्यार्थ्यांचे नांव, कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक असलेली यादी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कार्यालय,व विद्यापीठ क्रिडा मंडळ, पुणे विद्यापीठ यांचेकडून प्रमाणित करुन व विद्याशाखानिहाय एकत्रिक शुल्काचा डिमांड ड्राफ्ट सादर करणे आवश्यक आहे.</u>**

कळावे,

आपली,
[signature] २/४/१४
परीक्षा नियंत्रक

<u>विशेष सूचना</u> - परीक्षानिहाय वेगवेगळया याद्या व विद्याशाखानिहाय स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट पाठविणे गरजेचे आहे याची नोंद घ्यावी.

<u>प्रत माहितीसाठी</u> -

१. मा. संचालक, विद्यापीठ क्रिडा मंडळ, पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ.
३. सर्व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग.
४. कक्षाधिकारी, परीक्षा वित्त विभाग.

A१/B.Com..marathi/१०१